**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७६/२०१९** **दिनांक २०/०९/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १४/०९/२०१९ ते २०/०९/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २१/०९/२०१९ सकाळी ८:३० पासून २५/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१४/०९** | **१५/०९** | **१६/०९** | **१७/०९** | **१८/०९** | **१९/०९** | **२०/०९** | | **२१/०९** | **२२/०९** | **२३/०९** | **२४/०९** | **२५/०९** |
| ७७.० | ५९.० | ३१.० | ८२ | ५५ | ४३ | - | **पाऊस (मिमी)** | ८ | १७ | १७ | ४ | ३३ |
| ३१.४ | २९.३ | ३०.० | २७.१ | ३३.८ | ३२.० | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३३ | ३२ | ३२ | ३२ |
| २५.१ | २३.८ | २४.२ | २५.३ | २४.५ | २३.५ | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २४ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ७ | ६ | ४ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९१ | ९० | ९२ | ९३ | ९३ |
| १०० | १०० | ९३ | - | १०० | १०० | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७४ | ७२ | ७५ | ७१ | ७१ |
| ३ | १ | १ | १ | २ | १ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ११ | ११ | ९ | ६ | ३ |
| नै.द. | आ.द. | आ.पु. | द. | इ.पु. | इ.पु. | - | **वाऱ्याची दिशा** | आ.पू. | आ.पू. | आ.द. | आ.द. | द. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २१ ते २३ व २५ सप्टेंबर,२०१९ पर्यंत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक २० ते २६ सप्टेंबर,२०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार ठाणे जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पोटरी ते फुलोरा अवस्था** | • भात पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• निमगरवे भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असल्याने नत्र खताची तिसरी मात्रा ४३ किलो युरिया प्रती हेक्टर या प्रमाणात पाऊसाचा अंदाज घेवून देण्यात यावी.<br>• पाउसाची उघडझाप व ढगाळ वातावरणामुळे भात पिकावर बुरशीजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ट्रायसायक्लोझोल ७५ % पा. मि. भुकटी १० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारावी.<br>• पुढील पाच दिवस पाउसाची उघडझाप असून ढगाळ वातावरण असण्याची शक्यता असल्यामुळे पाणी साचून राहणाऱ्या भात खाचरात तसेच जेथे घट्ट लागवड आणि नत्र खताची अवाजवी मात्रा दिली असलेल्या क्षेत्रात तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. पिकाचे तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भावावर सातत्याने लक्ष ठेवावे. जर रोपाच्या चुडात ५ ते १० तुडतुडे आढळल्यास ॲसिफेट ७५ टक्के पाण्यात विरघळणारी भुकटी २.२५ ग्रॅम किंवा फिप्रोनिल ५ टक्के प्रवाही २ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ०.२ मि.ली प्रति लिटर पाण्यातून भात पिकावर फवारावे. तसेच खाचरात पाणी जास्त काळ न साठता फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी. टिप : फवारणी करताना कीटकनाशक चुडाच्या बुंध्यावर पडेल याची दक्षता घ्यावी. |
| **आंबा** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने कोवळ्या पालवीचे तुडतुड्यापासून पासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ९ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा बागेतील रोपांवर शेंडे पोखरण्याऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास कीडग्रस्त पालवी अळीसहित नष्ट करावी व क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा मोनोक्रोटोफस ३६ टक्के प्रवाही ११ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | -- | • रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/** | -- | • फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. |

**टीप: फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**